# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २७१/२०२४ दिनांक:- २३/०७/२०२४.

## "पोलीस, प्राचार्य, मुख्याध्यापक जनजागृती अभियान कार्यक्रम"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ परीसरामधील शालेय व महाविदयालयीन विदयार्थी यांना अंमली पदार्थांच्या सवयी पासून दूर ठेवणेसाठी, वाहतुकीचे नियमांचे पालन, तसेच सायबर क्राईमच्या गुन्हयांची जनजागृती व्हावी म्हणून, पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेमधून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे माध्यमातुन "पोलीस, प्राचार्य, मुख्याध्यापक जनजागृती अभियान" या महत्वपुर्ण कार्यक्रमाचे दिनांक २३/०७/२०२४ रोजी "संवाद हॉल" पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे आयोजन करण्यात आले आहे.

नमुद कार्यक्रमामध्ये उपस्थित मिरा-भाईंदर परिसरातील प्राचार्य, मुख्याध्यापक यांना अंमली पदार्थ विरोधी विभागाचे सादरीकरण पोनि/अमर मराठे यांनी केले. त्यांनी अंमली पदार्थाचे प्रकार, त्याचे शरिरावर होणारे परिणाम, मुलांवर ड्रग सेवनामुळे होणार परिणाम, शाळा व महाविद्यालय यांनी अंमली पदार्थ विरोधात काय उपायोजना कराव्यात याबाबत माहिती दिली. तसेच सन २०२४ मध्ये अंमली पदार्थ विरोधात पोलीस आयुक्तालयात ७६ गुन्हे दाखल करण्यात आले असुन ३३४ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचे सांगण्यात येवुन शाळा, महाविद्यालय परिसरातील १०० मी. परिसराच्या आत असणाऱ्या ९२ पान टपऱ्यांवर कोटपा कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

नमुद कार्यक्रमा मध्ये वाहतुक विभागाचे सादरीकरण पोनि/दादासाहेब करांडे यांनी केले. त्यांनी वाहतुक व्यवस्थेबाबत माहिती देताना प्रत्येक शाळा, महाविद्यालय यांनी शालेय परिवहन समिती स्थापन करुन विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या बसेस बाबत वाहतुक नियमाचे तंतोतंत पालन झाले पाहिजे याकडे लक्ष वेधले. तसेच शाळांमध्ये मोटर सायकल चालविताना हेल्मेट वापरणे, मोबाईलवर संभाषण न करणे, कार चालविताना सिट बेल्ट लावणे याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याबाबत सांगुन वाहन चालवताना वाहतुक नियमांचे तंतोतंत पालन करण्याबाबत सांगितले.

नमुद कार्यक्रमामध्ये भरोसा सेल, भाईंदर विभागाच्या मसपोनि/तेजश्री शिंदे यांनी पोक्सो कायदयाबाबत माहिती दिली. लहान मुलांविरुद्ध होणारे लैगींक अत्याचार, महिलांचे होणारे शोषन

याबाबत कायदेशीर तरतुदी समजावुन सांगुन शाळा महाविद्यालयामध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनिचे लैगिंक शोषनाची माहिती मिळताच ताक्ताळ पोलीस ठाणे यांना माहिती देण्याबाबत सुचित केले.

तसेच सायबर पोलीस ठाणेचे पोनि/सुजित गुंजकर यांनी सायबर जागरुकतेबाबत माहिती देताना सद्यस्थितीत घडणारे वेग-वेगळे सायबर गुन्हे, सोशल मिडीया संदर्भात घडणारे गुन्हे, ऑनलाईन सायबर गुन्हयास कशा प्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती, ऑलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व कश्याप्रकारे तक्रार नोंदवावी याबाबतची माहिती देवुन सोबत सायबर गुन्हे जनजागृती बाबत पत्रक वाटप करण्यात आले.

नमुद कार्यक्रमामध्ये मिरा-भाईंदर परिसरामधील १०४ शाळा, कॉलेज मधील प्राचार्य व मुख्याध्यापक हजर होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१ मिरारोड यांनी केले. कार्यक्रमात मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त व मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त यांनी उपस्थित प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियमांचे पालन, सायबर क्राईमच्या गुन्हयांची जनजागृती, अंमली पदार्थापासुन दुर राहण्याबाबत अवाहन करुन प्राचार्य व मुख्याध्यापक यांचे सोबत संवाद साधला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. राजेंद्र मोकाशी, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांनी मानले.

नमुद कार्यक्रमास मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, तसेच परिमंडळ ०१ मधील सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी हे हजर होते.

